जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय सुवर्णनगर ,
बस स्टॅडच्या मागे , मुठठे लेआऊट बुलडाणा -४४३००१.
Email:dwcd_bul@yahoo.com, दुरध्वनी क्र ०७२६२-२९५४०२

जा.क्र/ जिमबाविअ/म.वि/का.ठि.म.लै.छ./२०२५-२६ / 1120 दिनांक : ०४.०७.२०२५
०७

प्रति,
विभाग प्रमुख सर्व
जि. बुलढाणा

विषय :- कामाच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध,मनाई व निवारण) अधिनियम २०१३ अन्वये प्रचार प्रसिध्दीसाठी SHE BOX पोर्टलवर महिलेला तक्रार नोंदविता यावी यासाठी सर्व आस्थापनांना त्यांचे संकेतस्थळावर SHE BOX portal ची (https://shebox.wcd.gov.in) ही वेब लिंक उपलब्ध करून देणेबाबत..

संदर्भ :- १.शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग क्रमांक मकचौ-२०१४ प्र.क्र ६३ /मकक मंत्रालय मुंबई -३२ दि. ११ सप्टेंबर २०१४
२.. मा. सचिव , महिला व बाल विकास विभाग मुंबई यांचे पत्र दि. २४ जुन २०२५

सविनय सादर,

कामाच्या ठिकाणी कामाच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध , मनाई आणि निवारण) अधिनियम नुसार , कलम ४ (१) अन्वये कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक तक्रारींचे निवारण करण्यासाठी "अंतर्गत तक्रार समिती " तसेच कलम ६ (१) अन्वये जिल्हास्तरावर " स्थानिक तक्रार समिती" गठित करण्याची तरतूद आहे.

त्यानुषंगाने या अधिनियमात नमुद केलेली कार्ये पार पाडण्यासाठी मा. जिल्हाधिकारी बुलढाणा यांनी मा. निवासी उपजिल्हाधिकारी ,बुलढाणा यांना जिल्हा अधिकारी (District Officer) म्हणून नामनिर्देशित केलेले आहे. सदर अधिनियमानुसार स्थानिक तक्रार समिती गठित करण्याचे पूर्ण अधिकार प्रत्येक जिल्ह्याचे नियुक्त जिल्हा अधिकारी (District Officer) यांना दिलेले आहे.

संदर्भ क्र २ चे पत्रामधली मुद्दा क्र ४ अन्वये नमुद केल्यानुसार केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास मंत्रालयाने SHE Box Portal वर पिडीत महिलेस तक्रार नोंदविण्यासाठी (https://shebox.wcd.gov.in) ही web link उपलब्ध करून दिलेली असून सर्व आस्थापनांना त्यांच्या संकेत स्थळावर तसेच प्रचार प्रसिध्दीसाठी उपलब्ध असलेल्या अधिकृत माध्यमांवर (social Media) उपलब्ध करून द्यावी. असे निर्देश प्राप्त आहेत.

त्यानुषंगाने आपणास कळविण्यात येते की, केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास मंत्रालयाने SHE Box Portal वर पिडीत महिलेस तक्रार नोंदविण्यासाठी उपलब्ध करून दिलेली वेब लिंक (https://shebox.wcd.gov.in) ही आपल्या विभागाच्या संकेत स्थळावर तसेच प्रचार प्रसिध्दीसाठी उपलब्ध असलेल्या अधिकृत माध्यमांवर उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करावी. व तसा अहवाल या कार्यालयास तसेच जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयास उलट टपाली सादर करावा.

निवासी उपजिल्हाधिकारी
तथा जिल्हा अधिकारी
का.ठि.म.लै.छ. अधिनियम २०१३
बुलढाणा